सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, **पुणे** ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६ Email: ddtpho_pune@rediffmail.com

## कनिष्ठ आरेखक (गट-क) या पदासाठी
## "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"

**(अ) अर्ज करण्याची पद्धत**

कृपया सगळ्या सूचना वाचा आणि मगच अर्ज भरा.

**सूचना :**

**अर्ज भरण्याबाबत सूचना**

अर्जामध्ये खालील टप्पे आहेत :

- ❖ नोंदणी / नवीन खाते निर्माण करणे.
- ❖ प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.
- ❖ अर्ज सादरीकरण.
- ❖ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे.
- ❖ छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करणे
- ❖ अर्जाची प्रिंटआऊट काढणे.

❖ ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.१७.०७.२०२५ रोजी, रात्री २३.५९ वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

**(ब) अर्जदारांसाठी महत्त्वाच्या सूचना** :-

१) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक प्रमाणपत्रे / अन्य आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपूर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा. तसेच त्यासंदर्भातील वैध प्रमाणत्रांच्या मूळ प्रतीच्या Scan Images अपलोड कराव्यात.

२) ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परीक्षा केंद्र / बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध राहिल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवाराला परीक्षा तसेच कागदपत्र पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. सदरहु ऑनलाईन परीक्षेचे (Computer Based Test) आयोजन महाराष्ट्र राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नाशिक, मुंबई येथे केले जाईल. वाटप करण्यात आलेल्या परीक्षा केंद्रात काही अपरिहार्य कारणास्तव बदल होण्याची शक्यता असल्याबाबतही उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) **पदसंख्या**

**कनिष्ठ आरेखक : पदसंख्या व त्या पदाकरीता विहित आरक्षण**

| कनिष्ठ आरेखक (गट-क) वेतनस्तर- एस ०८, रु.२५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते (एकुण २८ पदे) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै.मा.प्र. | आ.दु.घ | अराखीव (खुला) | एकुण पदे |
| पदसंख्या | ३ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | ७ | २८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | २ | ३ | १६ |
| (२) महिला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| (३) खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (४) माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| (५) भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (६) प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (७) पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| (७) दिव्यांग | ०१ पद ( दिव्यांगांच्या कर्णबधीर अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D,HH) प्रवर्गासाठी आरक्षित ) | | | | | | | | | | | |
| (८) अनाथ | ------ | | | | | | | | | | | |

१) सर्व प्रादेशिक विभागांकडून अनुकंपा, अतिरिक्त संवर्ग कक्ष यांचेकडून प्राप्त होणाऱ्या माहितीला अनुसरुन तसेच अन्य इतर कारणांना अनुसरुन, उपरोक्त भरावयाच्या पदांचा संवर्ग, सामाजिक / समांतर आरक्षण तसेच, पदसंख्या व राखीव / बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

२) समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

३) उपरोक्त रिक्त पदांपैकी ०१ पद हे शासन नियमानुसार दिव्यांग उमेदवारांसाठी आरक्षित असून सदर पद सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरले जाईल.

❖ सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणातील मा.न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिरातीचे अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उमेदवारांच्या शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येतील.

४) **वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक १९ जून, २०२५ रोजी १७.०० वाजल्यापासून ते दिनांक २० जुलै, २०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २१ जुलै, २०२५ रोजी २३. ५९ वाजेपर्यंत |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबतच्या सूचना विभागाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

टिप –

१. कनिष्ठ आरेखक पदासाठी ऑनलाईन परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येतील. याबाबतच्या सूचना वेळोवेळी विभागाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

२. उमेदवारांच्या संख्येस अनुसरुन ऑनलाईन परीक्षा आवश्यकतेनुसार वेगवेगळया दिवशी वेगवेगळया सत्रांमध्ये घेण्यात येतील.

३. कनिष्ठ आरेखक या पदासाठीची परीक्षा २ स्तरांवर घेण्यात येणार असून प्रथमतः ऑनलाईन परीक्षेमध्ये किमान ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या उमेदवारांचीच व्यावसायिक चाचणी परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.

**५) सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता -**

| अ.क्र. | पद | किमान शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ आरेखक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता** – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मान्यताप्राप्त शासकीय संस्थेतून दोन वर्षाचे स्थापत्य किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक पाठ्यक्रम उत्तीर्ण प्रमाणपत्र; किंवा<br>(1) Two Year Certificate Course of Draftsman Civil under Craftsmen Training Scheme (CTS) in Government approved Industrial Training Institute and awarded National Trade Certificate (NTC) by NCVT which is recognized worldwide; **OR**<br>(2) Certificate Course of Draftsman Civil under Apprenticeship Training Scheme (ATS) in Government registered establishments and awarded National Apprenticeship Certificate (NAC) by NCVT which is recognized worldwide; **OR**<br>(3) Two Year Diploma Course in Draftsman Civil in Government approved Training Institute and awarded Vocational Diploma Certificate by Maharashtra State Board of Skill, Vocational Education and Training (MSBSVET) which is recognized as equivalent to Two Year Certificate Course of Draftsman Civil under Craftsmen Training Scheme (CTS) by Maharashtra State Government.<br>(4) Two Year Diploma Course in Architectural Draughtman in Government approved Training Institute and awarded Vocational Diploma Certificate by Maharashtra State Board of Skill, Vocational Education and Training (MSBSVET) which is recognized as equivalent to Two Year Certificate Course of Draughtsman Civil Under Craftsmen Training Scheme (CTS) by Maharashtra State Government.<br>**तांत्रिक अर्हता** – नामनिर्देशनाने उक्त पदावर नियुक्त करावयाच्या व्यक्तीने मान्यताप्राप्त संस्थेतून स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ऑटो-कॅड) किंवा अवकाशीय नियोजन (Spatial Planning) यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>परंतू, उमेदवाराने राष्ट्रीय कौशल्य अर्हता संरचना (एनएसक्युएफ) याच्याशी संलग्न स्थापत्य किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक पाठ्यक्रम उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र धारण केलेले असल्यास, त्याला मान्यताप्राप्त संस्थेतून स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ऑटो-कॅड) किंवा अवकाशीय नियोजन (Spatial Planning) यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात येईल". |

**टिप - प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास उमेदवाराने संबंधित किमान शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.**

६) **परीक्षा शुल्क :-**

| अराखीव (खुला) प्रवर्ग - १०००/- | राखीव प्रवर्ग - ९००/- |
|---|---|
| उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील. माजी सैनिकांसाठी परीक्षाशुल्क आकारले जाणार नाही. | |

उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील व त्याचा भरणा उमेदवारांनी करणेचा आहे.

- भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.urban.maharashtra.gov.in, www.dtp.maharashtra.gov.in व https://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.
- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

७) **वयोमर्यादा –**

| अ.क्र. | प्रवर्ग | | आवश्यक वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | किमान | कमाल |
| १ | अमागास | | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय / आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग | | १८ | ४३ |
| ३ | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | १८ | ४३ |
| ४ | माजी सैनिक | अमागास | १८ | ३८+सैनिकी सेवेचा कालावधी +३ |
| | | मागासवर्गीय / आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग | | ४३+ सैनिकी सेवेचा कालावधी +३ |
| ५ | दिव्यांग | | १८ | ४५ |
| ६ | प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त | | १८ | ४५ |
| ७ | पदवीधर अंशकालीन | | १८ | ५५ |

**टिप :-**

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी / सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी / उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील. तसेच, दिव्यांग, भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. शासन निर्णय क्र.मासैक-१०१०/ प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०.०८.२०१० मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत विहित वयोमर्यादेतील सूट ही त्यांचा सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

७) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन कर्मचारी आणि माजी सैनिक यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

८) उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी, त्यांनी या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

९) शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२ मधील तरतूदींनुसार मुलाखत घेण्यात येणार नसल्याने उमेदवारांची अंतिम निवड ही ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल. मात्र, उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण पडताळणी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रीयेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१०) कनिष्ठ आरेखक संवर्गासाठी ऑनलाईन परीक्षा एकूण १२० गुणांची (प्रत्येकी २ गुणांचा एक प्रश्न याप्रमाणे ६० प्रश्न) घेतली जाईल. त्यापैकी मराठी + इंग्रजी + सामान्यज्ञान + बौद्धिक चाचणी यासाठी प्रत्येक विषयास ३० गुण याप्रमाणे १२० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. सदर ऑनलाईन परीक्षा ही कनिष्ठ आरेखक या पदासाठी निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेशी संबंधित अभ्यासक्रमावर आधारित व ९० मिनिटांची असेल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. समान गुण मिळालेल्या उमेदवारांबाबत शासनाने निर्गत केलेल्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल. तथापि, जे उमेदवार परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील, अशा उमेदवारांनाच व्यावसायिक चाचणी देता येईल. व्यावसायिक चाचणी वेळापत्रकाबाबत अशा पात्र उमेदवारांना स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल. तसेच, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०४.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन परीक्षा व व्यावसायिक चाचणी यांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे शिफारस / निवडसूची तयार करुन शिफारस / निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल.

**कनिष्ठ आरेखक - अभ्यासक्रम**

| अ.क्र | विषय | घटक | प्रश्नांची संख्या | गुण | प्रश्न | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | व्याकरण (वाक्यरचना, शब्दार्थ, प्रयोग, समास, समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द ) | -- | -- | १५ | ३० |
| | | सर्वसामान्य शब्द संग्रह | | | | |
| | | म्हणी आणि वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग | | | | |
| | | उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे | | | | |
| | | वाक्यपृथःकरण व त्याचे प्रकार | | | | |
| | | लेखक व कवींची टोपण नावे | | | | |
| | | समूह दर्शक शब्द, ध्वनी दर्शक शब्द, प्राणी व त्यांची घरे | | | | |

| अ.क्र | विषय | घटक | प्रश्नांची संख्या | गुण | प्रश्न | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | इंग्रजी | Grammar | -- | -- | १५ | ३० |
| | | Common Vocabulary | | | | |
| | | Sentence Structure | | | | |
| | | Idioms and Phrases and their meaning | | | | |
| | | Comprehension of passage | | | | |
| | | Sentence Arrangement and Error Correction | | | | |
| ३ | सामान्य ज्ञान | चालू घडामोडी | ३ | ६ | | |
| | | भारताची राज्यघटना | | | | |
| | | महाराष्ट्राचा भुगोल, महाराष्ट्राचे व भारताचे नागरीकरण | | | | |
| | | मूलभूत संगणक ज्ञान<br>**माहिती तंत्रज्ञान**-डाटा कम्युनिकेशन, नेटवर्किंग आणि वेब टेक्नॉलॉजी | २ | ४ | | |
| | | **तांत्रिक संज्ञा आणि त्याचा वापर** - रंगसंगती, प्रमाण, नकाशा वाचन, सांकेतिक खुणा, प्रक्षेपणाचे प्रकार, सर्वेक्षणाचे प्रकार, रेखांकन, संरेखन, मोजमापाची परिमाणे व त्यांचे रुपांतरण, समोच्चरेषा व नकाशा (Contour Line and map) | २ | ४ | | |
| | | **संगणक सहायीत स्वयंचलित संरचना (AutoCad) मधील मूलभूत संकल्पना व Tools** | ३ | ६ | | |
| | | **भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आणि (GPS) मधील मूलभूत संकल्पना व Tools such as GIS data model and structures, Georeferencing and Coordinate Systems Spatial Analysis, GPS Data collection and its processing** | ५ | १० | | |
| | | | १५ | ३० | १५ | ३० |
| ४ | बौद्धीक चाचणी | क्रमबध्दमालिका, संख्या संचातील अंक शोधणे, समान संबंध किंवा परस्पर संबंध, आकृत्यामधील अंक शोधणे, वेन आकृती, कालमापन (दिनदर्शीका), रांगेवर आधारीत प्रश्न, सांकेतिक लिपी किंवा भाषा, विसंगत पद ओळखणे, विधाने व अनुमाने, आकृतीची आरशातील प्रतिमा, आकृतीचे पाण्यातील प्रतिबिंब, दिशा व अंतर, घडयाळ, नातेसंबंधीची ओळख, निरिक्षण आणि आकलन | ---- | | १५ | ३० |
| | | एकूण | ---- | | ६० | १२० |
| | | • कनिष्ठ आरेखक या पदासाठीची परीक्षा २ स्तरांवर घेण्यात येणार असून प्रथमतः ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल. सदर लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त होणारे उमेदवार व्यावसायिक चाचणीसाठी पात्र होतील. किमान ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या उमेदवारांचीच व्यावसायिक चाचणी परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.<br>• तसेच, लेखी परीक्षेतील व व्यावसायिक चाचणीमधील प्राप्त गुण एकत्रित करुन (एकूण २०० गुणांपैकी प्राप्त गुण विचारात घेऊन) निवडसूची प्रसिध्द करण्यात येईल.<br>• प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेता लेखी परीक्षा एका सत्रापेक्षा अधिक सत्रांमध्ये परीक्षा आयोजित करावी लागल्यास Z-Score Normalization पध्दत वापरण्यात येईल. | | | | |

११) कनिष्ठ आरेखक (गट-क) संवर्गाचे कार्ये आणि जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत:-

१. विकास योजना, प्रादेशिक योजना फेरबदलांची अचुकता तपासणी करणे व सहायक आरेखक यांचेकडून तपासून घेऊन ती अंतिम करणे.

२. शासनाकडून अधिप्रमाणित झालेले नकाशे भाग नकाशांनुसार वापर नकाशावर फेरबदल दर्शवुन घेणे व त्यांचे स्कॅनिंग करणे. मुळ अधिप्रमाणित नकाशे / अहवाल सुरक्षा कक्षात ठेवण्याकरीता सहायक आरेखक यांचेकडे सुपुर्द करणे व स्कॅनिंग प्रत नागरी संशोधन घटक कार्यासनाकडे वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता देणे व त्यांची रजिस्टरला स्वाक्षरी करुन घेणे.

३. सहायक आरेखक यांना कामामध्ये मदत करणे.

४. कार्यालयीन कामाकरिता विकास योजना, प्रादेशिक योजना यांचे अभिप्राय देणे व त्यांची गुगल/उपग्रह प्रतीमा नुसार शहानिशा करुन घेणे व आवश्यक वाटल्यास त्यांचा सविस्तर अहवाल तयार करुन घेणे व सहायक आरेखक यांची सदर कामात मदत घेणे.

५. शाखा कार्यालयामध्ये मा.महसूल विभागाकडून प्राप्त होणाऱ्या प्रकरणावर अभिप्राय देणे तसेच बांधकाम नकाशे तपासून त्यांचा अभिप्राय सहायक आरेखक यांचेमार्फत सादर करणे.

६. प्रकल्पग्रस्त, पुनर्वसन, पूरग्रस्त व शासनाचे उपक्रमानुसार प्राप्त होणारे प्रकरणी झोनिंग अभिप्राय व गावठाण विस्ताराचे रेखांकन करणे व मा.जिल्हाधिकारी यांना अहवाल तयार करुन वरिष्ठांकडे सादर करणे व काही प्रकरणी स्थळपाहणी करुन त्यानुसार अभिप्राय देणे.

७. मूल्यदर तक्ते तयार करताना मूल्य विभागानुसार नकाशे तयार करणे.

८. विकास योजना / प्रादेशिक योजना / नगर रचना योजना तयार करणे कामासंबंधित विभागाकडून आवश्यक ती माहिती एकत्रित करणे.

९. विकास योजना / प्रादेशिक योजना / नगर रचना योजना कामी प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्व्हेक्षण करुन उपलब्ध महसूली गाव नकाशानुसार आधारभूत नकाशा (base map) तयार करणे व विद्यमान व प्रस्तावित भूवापर (Existing land use) नकाशे तयार करणे (Propose land use) इत्यादी.

१०. कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जास अनुसरुन भाग नकाशे / झोन दाखले, सनद बीफॉर्म इत्यादी अर्जदारांना पुरवणे.

११. विकास योजना, प्रादेशिक योजनेसाठी लागणारे गाव नकाशे / नगर भूमापन नकाशे उपलब्ध करुन ते जोडून base map तयार करुन घेणे.

१२. कलम ३७(२), २०(३), २०(४) व ५० इत्यादी अन्वये प्रकरणी अभिप्राय देणे नकाशे तयार करणे इत्यादी.

१३. प्रारुप निवाडा छाननी प्रस्ताव प्राप्त झाल्यावर सेल्स प्लॅन तयार करणे व त्याकामी संबंधित विभागाकडून नोंदणिकृत खरेदी -विक्री व्यवहार प्राप्त प्राप्त करुन घेणे.

१४. विकास योजना, प्रादेशिक योजना तयार करुन झाल्यावर त्यांचे सादरीकरणासाठी Slides तयार करणे.

१५. कलम ३१(१) व ई.पी.मंजूरीचे फेरबदल नकाशावर दर्शवून तसे नकाशे विहित मार्गाने पाठविण्याकरीता तयार करणे.

१६. जी.आय.एस.नुसार संगणकावर विकास योजना, प्रादेशिक योजनाचे संपूर्ण परिपूर्ण नकाशे तयार करणे व तपासून ते सहायक आरेखकास सादर करणे.

१७. माहिती अधिकार अधिनियम, २००५ संबंधातील कार्यालयाची व इतर कार्यालयाची माहिती संकलित करुन वरिष्ठांना सादर करणे.

१२) शिफारस पात्र उमेदवारांची सूची जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१३) शासनाच्या, महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार **अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी**, अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र) सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना लागू राहतील.

१४) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी शासनाच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र) सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

१५) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ नुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा (अ), भ.ज (ब), भ.ज (क), भ.ज (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार उमेदवारांनी अर्ज करताना अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वैध असलेले (वित्तीय वर्ष २०२५-२०२६) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र) ऑनलाईन अर्ज भरताना अपलोड करणे आवश्यक आहे. अर्ज करतेवेळी अपलोड केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारेच अर्जाची प्रत्यक्षरित्या छाननी करण्यात येईल. तसेच, अर्ज करतेवेळी अपलोड केलेल्या सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे अर्जदारांवर बंधनकारक आहे अन्यथा त्यांची शिफारस रद्द करण्यात येईल.

१६) सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग - चार, सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रसिध्द अधिनियमानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या प्रयोजनांसाठी, उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू असेल आणि ज्या व्यक्ती, उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी असलेल्या सदर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०२४/ प्र.क्र.७५/आरक्षण-५, दि.२८ जून, २०२४ व दि.०५ जुलै, २०२४ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार, जात प्रमाणपत्र आणि अर्ज करताना अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वैध असलेले (वित्तीय वर्ष २०२५-२०२६) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र) अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. अर्जासोबत अपलोड केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारेच अर्जाची प्रत्यक्षरित्या छाननी करण्यात येईल. तसेच, अर्ज करतेवेळी अपलोड केलेल्या सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे अर्जदारांवर बंधनकारक आहे अन्यथा त्यांची शिफारस रद्द करण्यात येईल.

१७) ज्या उमेदवारांची निवड मागास / राखीव प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची निवड जात वैधता प्रमाणपत्राअभावी रद्द करण्यात येईल.

१८) खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण, शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै, २०१६, शासन शुद्धीपत्रक दि.१८ ऑगस्ट,२०१६ व शासन निर्णय दि.३० जून, २०२२ मधील व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. त्यांचेकरीता उच्च वयोमर्यादा कमाल ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. तथापि, वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तिंसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र गट - क या पदांवरील निवडीकरिता योग्य स्तरावरील असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार गट - क या पदापैकी खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणी करिता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे, परिक्षेचा अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवार प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र समजण्यात येणार नाही.

कागदपत्रे पडताळणीवेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र, तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरतो, याविषयी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला, तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

१९) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) असलेले आरक्षण शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. सदरहु आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करताना अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वैध असलेले (वित्तीय वर्ष २०२५-२०२६) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक यासाठी पात्र असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबतच अपलोड करणे आवश्यक आहे. अर्जासोबत अपलोड केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारेच अर्जांची प्रत्यक्षरित्या छाननी करण्यात येईल. तसेच, अर्जासोबत अपलोड केलेल्या सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे अर्जदारांवर बंधनकारक आहे अन्यथा त्यांची शिफारस रद्द करण्यात येईल.

## २०) माजी सैनिक आरक्षण

गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/ ३५०२/ सीआर-१००/ १६-अ दिनांक २ सप्टेंबर १९८३ नुसार,

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब) युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एक व्यक्ती त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने संबंधित पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करणात येणाऱ्या आदेशानुसार असतील. माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे, यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अपात्र ठरविण्यात येईल.

## २१) प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१ जानेवारी १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबावतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे, यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अनर्ह ठरविण्यात येईल.

## २२) भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील, गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी

यांचेकडील भूकंपग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणीअंती होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे, यापूर्वी सदर आरक्षणाचा लाम घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अपात्र ठरविण्यात येईल.

**२३) पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दि.२७ ऑक्टोबर २००९ व क्रमांक अशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ दिनांक १९ सप्टेंबर २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मूळ प्रमाणपत्र तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

पदवीधर अंशकालीन या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अपात्र ठरविण्यात येईल.

२४) शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२ मधील तरतूदीनुसार, ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासनाच्या महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/ प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी / मुलगे / मुलगी) यासाठी पात्र ठरेल.

२५) दिव्यांग व्यक्तींकरिता आरक्षित पदावरील नियुक्तीसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत, शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांकः- दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२ दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ मधील तरतूदीनुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करून देण्यात येतील. सदर शासन निर्णयासोबत संलग्न करण्यात आलेल्या APPENDIX 1 व APPENDIX II च्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्रांची पूर्तता संबंधित उमेदवारांनी करावयाची आहे.

२६) निवड झालेल्या उमेदवारांना शासन अधिसूचना क्र.रानिप्र-२०२२/प्र.क्र.३२/सेवा-४ दि.३०/०९/२०२२ अन्वये अथवा त्यानुषंगाने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित सूचनांस अनुसरुन राष्ट्रीय निवृत्त वेतन प्रणाली योजना लागू राहील.

२७) उमेदवार हा भारताचा नागरीक तसेच महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असणे आवश्यक आहे व त्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र त्याच्याकडे असणे आवश्यक राहील. तसेच त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२८) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांबाबत उमेदवारांस काही हरकत असल्यास प्रति प्रश्न रु. १००/- इतके शुल्क आकारले जाईल.

२९) वेगवेगळया सत्रांमध्ये पार पडणाऱ्या परीक्षेमधील प्रश्नपत्रिका वेगवेगळया असतील. अशा वेळी परीक्षार्थींची संख्या विचारात घेऊन परीक्षा एकापेक्षा अनेक सत्रांत पार पाडावयाची झाल्यास भिन्न प्रश्नपत्रिकांच्या काठिण्य पातळीचे समानीकरण (Normalization) करण्यात येईल व त्यासाठी पुढे नमूद केलेल्या Z-Score Normalization या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

## Z-Score Normalization

**About Normalization**

Normalization means adjusting values measured on different scales to a notionally common scale.

**Need for Normalization in Exam**

Exam pertaining for a particular post/course could be spread across multiple shifts which will have different question paper for each shift. Hence the normalization of scores need to be carried out for all the candidates who had written the exam, across shifts for the same post/course.

**Score Normalization logic**

For each shift, average and standard deviation is calculated. Average tells us about overall scoring. Standard deviation tells about spread of marks. Take example below of one shift and see how average and StdDev is calculated.

| Sr. | X (raw score) | x = (X-Xav) | $x^2$ |
|---|---|---|---|
| 1 | 31 | -34 | 1156 |
| 2 | 46 | -19 | 361 |
| 3 | 40 | -25 | 625 |
| 4 | 71 | 6 | 36 |
| 5 | 65 | 0 | 0 |
| 6 | 90 | 25 | 625 |
| 7 | 59 | -6 | 36 |
| 8 | 84 | 19 | 361 |
| 9 | 99 | 34 | 1156 |
| N = 9 | Total = L = ∑X = 585 | | $\sum x^2 = 4356$ |

Xav = : L / No. of candidates present for that particular shift = 585/9 = 65

$$\text{Standard Deviation} = \sqrt{(\sum x^2)/N} = \sqrt{4356/9} = \sqrt{484} = 22$$

As shown in example above for one shift, same process is followed for every shift to calculate mean and StdDev of each shift.

**Choosing the Base Shift**

Then to calculate normalized score for each candidate, first we need to consider one shift as base shift. Statistically any shift can be considered as base shift because normalization will put all candidates properly in relative position.

But to avoid reduction in marks after normalization, we normally consider shift with highest mean as base shift. Also, in particular shift, if number of candidates is too low, we may not consider that shift as base shift (for statistical purposes) even if it has highest mean. (Generally, this threshold is kept at 70%).

Normalized Score for each candidate (Xn)

To calculate normalized score of each candidate, following formula is used.

$$Xn = \frac{S2}{S1} * (X - Xav) + Yav$$

| | |
|---|---|
| S2 | Is the Standard Deviation of the base shift |
| S1 | Standard Deviation for the candidate shift (to be scaled to S2) |
| X | Raw score of a candidate |
| Xav | Simple average of the candidate Shift |
| Yav | Average of the base shift |

**३०) कनिष्ठ आरेखक परीक्षा पद्धती :-**

ऑनलाईन परीक्षा आयोजनाचे वेळी अंतर्भूत विषयानुषंगाने कनिष्ठ आरेखक संवर्गासाठी एकूण १२० गुणांची (प्रत्येकी २ गुणांचा एक प्रश्न याप्रमाणे ६० प्रश्न) ऑनलाईन परीक्षा घेतली जाईल. त्यापैकी मराठी + इंग्रजी + सामान्यज्ञान + बौद्धिक चाचणी यासाठी प्रत्येक विषयास अनुक्रमे ३०+३०+३०+३० गुण याप्रमाणे १२० गुणांची विषयानुषंगाने ४ (चार) गट असलेली ९० मिनिटांची परीक्षा घेण्यात येईल. इंग्रजी विषयाची परीक्षा इंग्रजी भाषेमध्ये तर मराठी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांची परीक्षा मराठी भाषेमध्ये घेण्यात येईल. यामध्ये गट - अ - मराठी - ३० गुण (२२.३० मिनिटे), गट - ब - इंग्रजी - ३० गुण (२२.३० मिनिटे), गट - क - सामान्यज्ञान - ३० गुण (२२.३० मिनिटे), गट - ड - बौध्दिक चाचणी - ३० गुण (२२.३० मिनिटे) असे चार गट असणार आहेत. उमेदवारास प्रश्नपत्रिकेत नमूद केल्यानुसारच्या गटनिहाय विशिष्ट क्रमाने प्रश्न सोडविणे अनिवार्य राहील. प्रथम गटातील प्रश्न त्या गटासाठी निर्धारित वेळेपूर्वी सोडविल्यास व निर्धारित वेळेपूर्वी तो गट सादर केल्यानंतर क्रमानुसार पुढील गट निवडता येईल. तसेच, सादर केलेल्या गटासाठी निर्धारित वेळेमधील उर्वरीत वेळ पुढील गटासाठीच्या निर्धारीत वेळेमध्ये समाविष्ट होईल. याप्रमाणे क्रमानुसार प्रत्येक गटातील प्रश्न सोडविल्यानंतरचा उर्वरीत वेळ पुढील गटासाठी उपलब्ध होईल. (जसे की, गट - अ - साठी निर्धारीत वेळ २२.३० मिनिटे आहे, परंतु, २० व्या मिनिटास गटातील प्रश्न सोडवुन गट सादर केल्यानंतर त्यातील उरलेली २.३० मिनिटे पुढील गटासाठी (उदा. गट-ब साठी) २२.३० + २.३० = २५ मिनिटे एवढा कालावधी उपलब्ध होईल) तसेच, निर्धारीत वेळेपूर्वी गटातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी निर्धारीत वेळ संपली किंवा गट सादर करण्यापूर्वीच निर्धारित वेळ संपल्यास गट सिस्टीमकडुन आपोआप सादर होईल. एका गटातील प्रश्न सोडवून गट उमेदवाराने सादर केल्यानंतर / सिस्टीमद्वारे सादर झाल्यानंतर पुन्हा त्या गटामध्ये जाता येणार नाही. प्रस्तुतची प्रकिया सर्व गटांसाठी लागू राहील व अंतिमतः जरी सर्व गटांची उत्तरे सादर केली तरी, परीक्षेचा संपूर्ण वेळ संपल्यानंतरच उमेदवारास परीक्षा कक्ष सोडता येईल.

३१) शिफारस झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रे छाननीच्या वेळी, पडताळणी समितीकडे खालील मूळ प्रमाणपत्रांसह त्याच्या साक्षांकित छायाप्रती दोन प्रतीत सादर करणे बंधनकारक राहील.

१. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र -शासनमान्य संस्थेने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
२. अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) – शासन / खाजगी संस्थेने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
३. अधिवास प्रमाणपत्र - महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
४. जन्मतारखेबाबत - जन्म नोंदीचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र / एस.एस.सी. गुणपत्रिका व प्रमाणपत्र.
५. जात प्रमाणपत्र - राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
६. जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) - जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र.
७. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र -असे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल अशा उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वैध असलेले प्रमाणपत्र. (वित्तीय वर्ष २०२४-२०२५)
८. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र - विवाहित उमेदवारांसाठी नमुना-अ मध्ये सादर करणे.
९. खेळाडूबाबतचे प्रमाणपत्र – संबंधित सक्षम क्रीडा प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
१०. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्याबाबतचे पत्र - संबंधित जिल्हास्तरीय समितीने निर्गमित केलेले पत्र.
११. दिव्यांगाचे प्रमाणपत्र - संबंधित सक्षम जिल्हा शल्य चिकित्सकाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
१२. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र - संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.
१३. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग प्रवर्गासाठी - संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

याव्यतिरिक्त वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन आदेशानुसार अन्य प्रमाणपत्रांची आवश्यकता भासल्यास ती पुरविण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारावर राहील.

३२) विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या मान्यतेने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे. अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे. याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

३३) उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या निवडी संबंधात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल. तसेच नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या अर्हताविषयक अटी पूर्ण न करणाऱ्या अथवा कोणत्याही प्रकारे गैरवर्तणूक / गैरप्रकाराचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर शिफारस / निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल आणि / किंवा सदर उमेदवार इतर योग्य अशा कारवाईस पात्र असेल.

३४) प्रस्तुतच्या सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भाने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना लागू राहतील.

**(क) इतर सर्वसाधारण सूचना :-**

१) कनिष्ठ आरेखक या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील कोकण-१ / कोकण-२ / नाशिक / पुणे / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर विभागात नियुक्ती देण्यात येईल.

२) अर्ज केल्यानंतर पुढील निवड प्रक्रियेला विशिष्ट कालावधी लागणार असल्यामुळे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्याबाबत नगर रचना संचालनालयाकडे अथवा त्यांचे अधिनस्त कार्यालयांकडे कुठलीही चौकशी (मौखिक अथवा लेखी) किंवा दूरध्वनी करु नये.

३) कनिष्ठ आरेखक पदांवर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्यात नगर रचना संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात तसेच महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती / विकास प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे / प्रदेश विकास प्राधिकरणे / शासनाची संबंधित इतर प्राधिकरणे / कार्यालये यापैकी कोठेही नियुक्ती / बदली होऊ शकेल.

४) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे अर्जदारास परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे असणार नाही. शिफारशीच्या / निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास, खोटी कागदपत्रे दिल्याचे आढळल्यास, त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्दबादल होईल.

५) निवड प्रक्रीयेसंदर्भात शासन / न्यायालयाचे निर्णय सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहातील. कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव भरती / शिफारस / निवड प्रक्रीया स्थगित / रद्द करण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी / राज्य निवड समितीने राखून ठेवले आहेत.

---*---